# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १९०-२२** **दिनांक :- २३/०६/२०२२**

## अपहरणाच्या गुन्हयातील अल्पवयीन बालक त्याच्या पालकांच्याच ताब्यात असल्याची खात्री करुन दाखल असलेला गुन्हा उघड करण्यात पोलीसांना यश.

दिनांक ११.०४.२०१९ रोजी फिर्यादी श्री. देवेंद्र प्रताप सिंह, वय-४४ वर्ष, रा. खारेगाव, भाईंदर पुर्व, ता. जि. ठाणे यांनी नवघर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती की, त्यांचे कायदेशीर रखवालीतुन राजेंद्र हॉनिकॉम चॅरीटेबल ट्रस्टचे मुलांचे अनाथ आश्रमातुन अनाथ अल्पवयीन मुक मुलगा, नाव पत्ता माहित नाही, वय अंदाजे ४ ते ५ वर्षे यास कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नवघर पोलीस ठाणे येथे I गुन्हा क्र. ११४/२०१९ भादविसं.क. ३६३ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर हे समांतर तपास करत असतांना वायोर पोलीस ठाणे, वेस्ट कच्छ, भुज, राज्य-गुजरात येथील सहा.पो.उपनिरीक्षक राजेश जोशी यांनी सदर मुलाचे ठाव ठिकाणाबाबत उपयुक्त माहिती दिली. सदर माहितीवरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे सपोउपनि उमेश पाटील हे पथकासह वरिष्ठांचे परवानगीने फिर्यादी यांना सोबत घेवुन ग्राम सोनबुडी, ता. सेसवान, जि. बधायु राज्य-उत्तरप्रदेश येथे रवाना झाले होते. पथकातील पोलीस अंमलदार यांनी सदर ठिकाणी तपास करुन खात्री केली असता समजुन आले की, अनाथ आश्रमामधून हरविलेला मुक मुलगा हा त्याचे वडिल महेंद्र जातव यांचेसोबत असून तो सुखरुप आहे. त्यामुळे नवघर पोलीस ठाणे येथे दाखल असलेला अपहरणाचा गुन्हा उघडकीस आला आहे.

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. देविदास हंडोरे, सपोउनि. उमेश पाटील, मपोहवा/सुप्रिया तिवले, पोशि/केशव शिंदे, सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.